





दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०१ डिसेंबर २०२४


## अखेर ठरलं ! आझाद मैदानावर होणार शपथविधी सोहळा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून येत्या ५ डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. याबाबत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली.



राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. २३ नोव्हेंबर रोजी एकत्रित निकाल जाहीर झाले. २८८ सदस्य असलेल्या विधानसभेत २३५ जागा महायुतीच्या वाट्याला गेल्या. त्यामुळे महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. परंतु, निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतरही महायुतीकडून सत्ता स्थापनेकरता उशीर करण्यात आला. मुख्यमंत्री आणि इतर मंत्रिपदाकरता जोरदार रस्सीखेच अद्यापही सुरू आहे. त्यामुळे राज्यात नवं सरकार कधी स्थापन होणार असा प्रश्न सातत्याने विचारला गेला.

दरम्यान, आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्स पोस्ट करून शपथविधीबाबत महत्त्वाची माहिती दिली. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानात हा सोहळा रंगणार असून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही येणार आहेत. राज्यात मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून अद्याप तिन्ही पक्षांमध्ये सहमती झालेली नाही. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील, हे स्पष्ट करण्यात आले.

पण काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागण्यांमुळे गाडी अडल्याचे सांगण्यात येते. एवढे प्रचंड बहुमत मिळूनही विधिमंडळ नेता निवडीसाठी आमदारांची साधी बैठकही अद्याप होऊ शकलेली नाही. भाजपच्या आमदारांमध्येही ही अस्वस्थता जाणवते.

**१ मुख्यमंत्री अन् २ उपमुख्यमंत्री**

दरम्यान, आज माध्यमांशी संवाद साधताना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाची माहिती दिली. भाजपाचा मुख्यमंत्री होणार असून महायुतीतील इतर दोन प्रमुख घटकपक्षातील प्रत्येकी एक-एक असे दोन उपमुख्यमंत्री राज्याला लाभणार आहेत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

## किनवट तालुक्यात अवैध धंद्यांचा सुळसुळाट, प्रशासन उदासीन

**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.३०, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यात सध्या अवैध धंद्यांना ऊत आला असून, विविध प्रकारच्या गैरप्रकारांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. दारू, मटका, जुगार, वाळू तस्करी यांसारख्या अवैध धंद्यांमुळे सामाजिक व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. दुर्दैवाने, प्रशासन आणि पोलिस विभाग याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.स्थानीकांमध्ये संतापाची लाट

गेल्या काही दिवसांत अवैध धंद्यांमुळे सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरुण पिढी या विघातक प्रवृत्तींच्या नादी लागल्यामुळे अनेक पालकही चिंतेत आहेत. तथापि, संबंधित विभागांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने जनतेत संताप व्यक्त होत आहे.जनतेची मागणी – कडक कारवाई करा नागरिकांनी मागणी केली आहे की, प्रशासनाने तातडीने सक्रिय होऊन या धंद्यांवर कारवाई करावी. अवैध धंद्यांमध्ये सामील असणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर पावले उचलून या समस्या मुळापासून नष्ट कराव्यात.लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी याबाबत भूमिका स्पष्ट करावी आणि तातडीने उपाययोजना राबवाव्यात, अशी जनतेची मागणी आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. शासनाच्या कारवाईची प्रतीक्षा

सद्य परिस्थितीत नागरिकांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहून शासन आणि पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली नाही, तर हा प्रश्न अधिक गंभीर रूप घेईल. या समस्येवर लक्ष केंद्रित करून अवैध धंदे थांबवण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील ७४ केंद्रावरील मतदान यंत्रांची होणार पडताळणी ?

### थोरात, लंके, शिंदे यांचेही ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील अकोले व श्रीरामपूर वगळता १० विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवारांनी मतदान यंत्रे पडताळणीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले आहेत.



त्यांच्या मागणीनुसार जिल्ह्यातील ७४ मतदान केंद्रातील ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची पडताळणी केली जाणार आहे. दरम्यान, एका मतदान यंत्राच्या पडताळणीसाठी ४७ हजार २०० रूपयांचे शुल्क निवडणूक आयोगाकडून आकारले जाते.

त्यानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे (जिल्हा कोषागार) १० उमेदवारांनी मिळून एकूण ३४ लाख ९२ हजार ८०० रूपयांचे शुल्क जमा केले आहे. निवडणूक निकालानंतर मतदान यंत्र पडताळणीसाठी ७ दिवसांत अर्ज करण्याची मुदत होती. ही मुदत काल, शुक्रवारी संपुष्टात आली. अखेरच्या दिवशी शिर्डी मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांनी २ मतदान केंद्रातील यंत्रे पडताळणीसाठी तर शेवगाव मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) उमेदवार प्रताप ढाकणे यांनी शेवगावमधील २ तर श्रीगोंदे मतदारसंघातील अपक्ष उमेदवार राहुल जगताप यांनी २ मतदान केंद्रातील यंत्रे पडताळणीसाठी अर्ज दाखल केले.

यापूर्वी बाळासाहेब थोरात (काँग्रेस) यांनी संगमनेरमधील १४, शंकरराव गडाख (शिवसेना उध्दव ठाकरे गट) यांनी नेवासा मतदारसंघातील १०, राणी लंके (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) यांनी पारनेरमधील १८, भाजपचे राम शिंदे यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघातील १७, अभिषेक कळमकर (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) यांनी अहमदनगर शहर मतदारसंघातील ३, प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी शरद पवार गट) राहुरी मतदारसंघातील ५ तर कोपरगाव मतदारसंघातील राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) उमेदवार संदिप वर्पे यांनी देखील पोहेगाव या एका मतदान केंद्रातील यंत्र पडताळणीसाठी शुल्क जमा करून जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला आहे.

या अर्जानुसार व्हीव्हीपॅट, बीयु व सीयु असे मतदान यंत्रांची पडताळणी केली जाईल. मात्र त्यासाठी या मतदारसंघातील निवडणुकीला न्यायालयात आव्हान दिले जाते का याची प्रतिक्षा केली जाईल. हि प्रतिक्षा ४५ दिवसांची आहे जर न्यायालयात आव्हान दिले गेले असेल तर न्यायालयाच्या परवानगीने व आव्हान दिले गेले नसेल तर ४५ दिवसांनंतर पडताळणी केली जाणार आहे.

## मागील वर्षीचे २०० रुपये टनाप्रमाणे पैसे द्या... चालू वर्षी गाळप होणाऱ्या ऊसाचा दर जाहीर करा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** २०२३/२०२४ या गळीत हंगामात मौजे देसवडे, मांडवे खुर्द, आणि परिसरातून शेतकऱ्यांचा ऊस मोठया प्रमाणात माळकुप येथिल ग्रीन एनर्जी लिमिटेड या कारखान्यास देण्यात आला होता.ऊसाची तोडणी करण्या अगोदर कारखान्याचे एम डी यांनी गावा-गावात मीटिंग घेऊन शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, तुमच्या ऊसाला ईतर कारखान्या प्रमाणे दर देऊ पण मागिल हिशोब बाकी असतानाच चालू हंगामातील ऊस तोड चालु केली आहे. शेजारील संगमनेर कारखान्याने अंतिम दर ३००० रु दर दिला आहे, तरी आपण दिलेल्या शब्दाप्रमाने उर्वरीत २०० रू टणा प्रमाणे शेतकऱ्यांना पैसे देण्यात यावे. तसेच चालु वर्षीचा कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला असुन कारखान्याने कोणत्याही प्रकारे दर जाहीर न करता ऊस तोड चालु केली आहे त्यामूळे शेतकरी संभ्रमाअवस्थेत आहे तरी आपण चालु हंगामाचा दर जाहीर करून मगच ऊस तोड सुरू करावी .दोन्ही मागण्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा या मागणीचे निवेदन भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे चेअरमन महेश करपे यांना देण्यात आले. या वेळी सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, दत्ता फटांगरे, मा. चेअरमन संजय भोर, अविनाश भोर, संतोष काकडे, संपत फटांगरे, अण्णा भोर, भाऊसाहेब खाडे, मंजाबापू वाडेकर, बाबासाहेब टेकुडे, रावसाहेब गोळे, महिपती दरेकर, नवनाथ जाधव यांच्यासह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.



## रहिवाश्यांना बेघर करणाऱ्या विकास आराखड्याला तीव्र विरोध करणार : आ. जितेंद्र आव्हाड

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३०, कळवा (ठाणे) :** राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या धामधुमीत जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांचे नेते,पदाधिकारी आणि कार्यकर्ते गुंतले असताना ठाणे महापालिका प्रशासनाने शहराचा नवीन प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. हा विकास आराखडा विशिष्ट हेतू समोर ठेवून तयार करण्यात आला आहे. या आराखड्यातील प्रस्तावित रस्ता ४५ हजार एवढी लोकसंख्या असलेल्या वेगवेगळ्या सोसायट्यांमधून जात असून, यामुळे कळवा-खारीगाव उध्वस्त करण्याचा पालिकेचा हेतू आहे असा थेट आरोप कळवा मुंब्रा मतदारसंघाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.



राज्याच्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आधीच ठाणे महापालिका प्रशासनाने शहराचा विकास आराखडा गपचुप तयार केला असून या विकास आराखड्यामुळे घोडबंदर, वर्तक नगर, ठाणे शहर आणि कळवा,खारीगाव तसेच मुंब्रा येथील हजारो इमारतींवर वरवंटा फिरवला जाणार असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

आराखडे मंजूर असलेल्या सोसायट्यांमधून अवाढव्य रस्ते तयार करून कळव्यातील शेकडो इमारती उध्वस्त करण्यात येणार असून या विकासातून कळव्यातील तब्बल ४५ हजार रहिवाशी बेघर होणार आहेत. विकास आराखडा नक्की कोणाच्या भल्यासाठी तयार करण्यात आला आहे? असा संतप्त सवाल आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत उपस्थिती केला.

या आराखड्यात पालिकेने खारीगांव मधून डीपी रोडचा प्रस्ताव टाकला आहे. हा डीपी रोड पुढे नाशिक महामार्गाला जोडला जाणार आहे. या डीपी रोडमुळे खारीगांवची मूळ संस्कृती नष्ट होणार आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या खारीगांवातील १७ रहिवासी इमारती, ग्रामपंचायती पासूनची १८ जुनी घरे तसेच खारीगांवची ग्रामदेवता, जरीमरीचे प्राचीन मंदिरही या विकास आराखडयामुळे तोडले जाणार आहे. येत्या काही दिवसांत ठाण्यात जनआंदोलन उभे करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिला आहे.

दरम्यान कळवा आणि खारीगांव भागातील मंदिरे, मैदाने, इमारती, उच्चभ्रू सोसायटी बाधीत होणार आहेत. विकास आराखडा तयार करताना ज्या काही करामती केल्या आहेत; त्याचाही पर्दाफाश आपण करणार असून कावेरी सेतूची मालकी कोणाकडे आहे. त्याचा एफएसआय वापरता येतो का? तो एफएसआय कोणी कसा वापरला? यात कोणाचे चांगभलं झाले हे लवकरच उघड करण्यात येईल असा इशारा आव्हाड यांनी दिला.

इथे विकास आराखड्याचा गाजावाजा केला जात आहे. मात्र कळवा, मुंब्रा या भागातील विकास आराखड्यातील रस्त्यांवरच अतिक्रमणे उभी राहत आहेत आणि येथील पालिका अधिकारी प्रति चौरसफुटामागे ३०० रुपये घेऊन आपले खिसे भरत आहेत. परंतु कारवाई करण्यासाठी पालिका पुढे येत नसल्याचा आरोप देखील आव्हाड यांनी यावेळी केला.

## मौन सोडताच स्वकीयांवर डागली टीकेची तोफ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, बुलडाणा :** अखेर आ.संजय गायकवाड यांचा संयम बुलढाण्यातील एका जाहीर कार्यक्रमात तुटलाच! राज्याच्या मुख्यमंत्री पदी पुन्हा एकनाथ शिंदे पुन्हा विराजमान व्हावे यासाठी स्थानिय विष्णुवाडी मधील गजानन महाराज मंदिरात महाआरती आणि आमदारांच्या सत्काराचा सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी अखेर आपल्या राजकीय मौनाचा त्याग करून मनातील खदखद आक्रमक पणे व्यक्त करीत गौप्यस्फोट केले. निवडणुकीत कोणत्याच नेत्याने माझे काम केले नाही.अगदी केंद्रीय मंत्री (प्रतापराव जाधव) आणि भाजपचे आमदार संजय कुटे यांनीही माझं काम केले नाही. काम (प्रचार) तर सोडाच, पण विरोधी पक्षाचे (ठाकरे गटाचे) तिकीट 'त्यांना' मिळवून देण्याचे काम केले, असा सनसनाटी आरोप करून त्यांनी धमाल उडवून दिली.

'आमचे केंद्रीय मंत्री आमच्या सोबत नव्हते, असा गंभीर आरोप संजय गायकवाड यांनी यावेळी केला. या कार्यक्रमात आमदार संजय गायकवाड आपल्या मनातील शल्य बोलून दाखविताना म्हणाले की एकही(मित्र) पक्षाचा नेता माझ्या सोबत नव्हता,भाजपाचे अनेक नेते,आमचे केंद्रीय मंत्री आमच्या सोबत नव्हते, भाजपाचे जिल्ह्यातील प्रमुख। नेते आमदार संजय कुटे आणि आमचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी तर आमच्या विरोधी पक्षाच्या उमेदवाराचे तिकीट फायनल केल्याचा गंभीर आरोपही आमदार गायकवाड यांनी केला . मतदारांविषयची नाराजी देखील त्यांनी बोलून दाखविली. आपण बुलढाणा शहराचा चेहरा बदलला, मतदारसंघात कोट्यवधीची विकास कामे केल्याने ही लढत सहज जिंकू असा आत्मविश्वास होता.मात्र अत्यल्प मतांनी जिंकल्याने सत्कार स्वीकारण्याची देखील मानसिकता नाही.एकेक मतांसाठी भीक मागावी लागत असेल, शहरात लंडन मिळता मागे राहिल्याने लोकशाही वरचा विश्वास उडतो. फक्त पैश्यासाठी लढणाऱ्या विरोधक सोबत लोक गेल्याने भविष्यात निवडणूक लढवावी की नाही?असा उद्विग्न सवाल त्यांनी केला. दरम्यान या भाषणाचा व्हिडीओ समाज माध्यमावर धुमाकूळ घालत आहे.

## छत्रपती शिवेंद्रसिंहराजेंच्या मंत्रीपदावर शिक्कामोर्तब ! विश्वसनीय सूत्रांची माहिती

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.३०, सातारा :** महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कोण याबाबत केंद्रीय नेतृत्वाने गुप्तता पाळली असली तरी पुढील महिन्यात ५ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता आजाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे.

महायुतीकडून याची जोरदार तयारी सुरू झाली असून शपथविधीसाठी केंद्रातील दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्र्यांसह महायुतीतील अनेक सदस्य शपथ घेणार असून भाजपच्या पहिल्या यादीतच सातारा जावळी विधानसभेचे आमदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे नाव सामील असल्याची माहिती विश्वासनीय सूत्रांकडून मिळालेली आहे. त्यामुळे छत्रपती



प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नव्या सरकारमध्ये अनेक आमदार मंत्री पदासाठी इच्छुक असून बाबाराजेंच्या मंत्रीपदासाठी त्यांचे मोठे बंधू सातारा जिल्ह्यात महायुतीसाठी किंग मेकर ठरलेले खासदार छत्रपती उदयनराजे भोसले स्वतः आग्रही असल्यामुळे सातारा जावळी तालुक्यातील लाल दिवा फिक्स झाला आहे.

## संपादकीय



### द किंग इज बॅक

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली.

गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली.

पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक....असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली.

या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० सामन्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही.

मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्व कसोटी अजिंक्यपद (ंॅिल) देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही.

# एड्स : एक संक्रमित गंभीर आजार

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जगभर जनजागृती व्हावी आणि या रोगामुळे मरण पावलेल्यांचा शोक व्यक्त करण्यासाठी हा दिवस पाळावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. सरकारी आणि आरोग्य अधिकारी, अशासकीय संस्था आणि जगभरातील व्यक्ती एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणावरील शिक्षणासह हा दिवस साजरा करतात. सन २०१७पर्यंत एड्समुळे जगभरात २.८९ कोटी ते ४१.५ कोटी लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अंदाजे ३.६७ कोटी लोक एचआयव्ही सह जगत आहेत, ज्यामुळे हे अभिलिखित इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या जागतिक सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे.

एड्स हा एक गंभीर आजार आहे. हा एक संक्रमित आजार असून या आजारामुळे जगभरात आतापर्यंत लाखो रूग्णांनी जीव गमावला आहे. ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस- एचआइव्हीमुळे होणाऱ्या ॲक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम- एड्स या गंभीर आजाराबद्दल जगभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि या आजाराने पीडित असलेल्या व्यक्तींना पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि समर्थन देण्यासाठी दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो.

एड्स या आजारासंदर्भात सर्व प्रकारच्या वयोगटातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या दिनाचा मुख्य हेतू आहे. आज जागतिक एड्स दिनच्या निमित्ताने आपण या दिवसाचा इतिहास आणि महत्व जाणून घेणार आहोत.

जागतिक एड्स दिनाचा इतिहास- एचआयव्हीचा प्रसार हा सर्वात आधी प्राण्यांपासून झाला होता. १९व्या शतकात आफ्रिकेतील माकडांच्या एका विशिष्ट प्रजातीमध्ये एड्सचा विषाणू पहिल्यांदा आढळून आला होता. हा रोग माकडांपासून माणसांमध्ये पसरला. आफ्रिकेमध्ये माकडे खाल्ली जात असत. त्यामुळे, हा रोग माकडांपासून माणसांमध्ये पसरल्याचे सांगितले जाते.

जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओने सर्वात आधी १ डिसेंबर १९८८मध्ये जागतिक एड्स दिनाची स्थापना केली होती. स्थानिक आणि राष्ट्रीय अधिकारी, आंतरराष्ट्रीय संस्था आणि नागरिकांमध्ये या आजाराच्या संदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना या आजाराची माहिती मिळावी, यासाठी या दिनाची स्थापना केली होती. त्याप्रमाणे सन १९८८मध्ये पहिला एड्स दिन साजरा करण्यात आला. ज्यावेळी हा दिवस साजरा करण्यात आला त्यावेळी सुमारे ९० हजार ते १.५ लाख लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह होते, असे सांगितले जाते. त्यामुळे वैद्यकीय जगतात खळबळ उडाली होती, त्यामुळे एड्सबद्दल किंवा एचआयव्हीबद्दल लोकांना शिक्षित आणि जागरूक करण्यासाठी जागतिक संस्थांना एकत्रित करून निधी देण्यावर भर देण्यात आला.

एड्स दिनाचे महत्व: मागील कित्येक वर्षांपासून जागतिक एड्स दिन हा साजरा केला जात आहे. हा एक गंभीर आजार आहे. अशा परिस्थितीमध्ये या आजाराबाबत सर्वांना जागरूक करण्यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. जगभरातून या आजारास समूळ नष्ट करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. तसेच, या आजारामुळे होणारे मृत्यू रोखणे



आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या पीडितांना योग्य उपचार देणे महत्वाचे आहे. सन १९८८पासून १ डिसेंबर रोजी प्रत्येक वर्षी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने एड्स या आजारासंबंधी जागरूकता वाढवणे, एड्स या साथीच्या संसर्गाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि एचआयव्ही विरुद्ध लढ्यात सहभागी होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. एड्स हा रोग ह्युमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस- एचआयव्ही द्वारे होतो. एचआयव्ही शरीरातील रोगप्रतिकारक पेशी नष्ट करतो किंवा त्याचे नुकसान करतो.

एड्सची लक्षणे- एड्सची पहिली लक्षणे म्हणजे इन्फ्लूएंझा- फ्लूसारखी लक्षणे किंवा सूजलेल्या ग्रंथी असू शकतात. परंतु काही वेळा लक्षणे दिसू शकत नाहीत. दोन किंवा तीन महिन्यांनंतर लक्षणे दिसू शकतात. घसा खवखवणे, स्नायू दुखणे, पुरळ, तोंड किंवा जननेंद्रियाच्या अल्सर, डोकेदुखी, ताप, मुख्यत: मानेवर सूजलेल्या लिम्फ ग्रंथी, सांधे दुखी, अतिसार, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असू शकतात. एड्स होण्याची कारणे- एखाद्या व्यक्तीस अनेक मार्गांनी एचआयव्ही- एड्सची लागण होते.

रक्त संक्रमण- काही प्रकरणांमध्ये रक्त संक्रमणाद्वारे व्हायरस संक्रमित केला जाऊ शकतो. एकच इंजेक्शन वापरणे- संक्रमित रक्ताने दूषित झालेल्या सुया आणि सिरिंजच्या माध्यमातून एचआयव्ही संक्रमित केला जाऊ शकतो. लैंगिक संपर्कः एचआयव्ही संक्रमण ज्यामुळे अधिक पसरते ती संक्रमण म्हणजे लैंगिक संपर्क होय. आईपासून मुलापर्यंत: एचआयव्ही विषाणूची लागण असलेली गर्भवती महिला त्यांच्या सामायिक रक्त परिसंचरणातून तिच्या गर्भावर व्हायरस संक्रमित करू शकते किंवा संक्रमित आई आपल्या दुधातून आपल्या बाळामध्ये विषाणू संक्रमित करू शकते. या गोष्टी करण्याने एड्स होत नाही- हात मिळवणे, मिठी मारणे, चुंबन, शिंका येणे, अखंड त्वचेला स्पर्श करणे, समान शौचालय वापरणे, एकच टॉवेल वापरणे, एचआयव्ही ग्रस्त व्यक्तीचे लाळ, अश्रू, मल आणि मूत्र याद्वारे एचआयव्ही पसरत नाही.

एड्स दिवस, जो आज संपूर्ण जग साजरा करत आहे, त्याची संकल्पना थॉमस नेटर आणि जेम्स डब्लू.बन यांनी सन १९८७मध्ये मांडली होती. थॉमस नेटर आणि जेम्स डब्ल्यू.बन हे दोघेही स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या एड्स ग्लोबल प्रोग्रामसाठी सार्वजनिक माहिती अधिकारी होते. त्यांनी एड्स दिनाची त्यांची कल्पना डॉ.जोनाथन मुन, एड्स ग्लोबल प्रोग्रामचे संचालक यांच्याशी शेअर केली, ज्यांनी या कल्पनेला मान्यता दिली आणि सन १९८८पासून, १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. सुरुवातीला जागतिक एड्स दिन केवळ लहान मुले आणि तरुणांशी संबंधित होता, परंतु नंतर एचआयव्ही संसर्ग कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकतो, असे आढळून आल्यानंतर सन १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर एड्सचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम हाती घेतले आणि सन १९९७पासून जागतिक एड्स मोहीम सुरू केली.

एचआयव्ही हा एक गंभीर आजार आहे जो एक प्रकारच्या प्राणघातक संसर्गामुळे होतो. एड्सचे पूर्ण नाव अक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम आहे. हा एक प्रकारचा विषाणू आहे, ज्याचे नाव एचआयव्ही- ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस आहे. या आजारात संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीवर हा व्हायरस हल्ला करतो. त्यामुळे शरीर सामान्य आजारांशीही लढण्यास असमर्थ ठरते. विशेष म्हणजे हा आजार तीन टप्प्यात होतो, प्राथमिक अवस्था, वैद्यकीय विलंब आणि एड्स. सन १९५९ साली काँगोमध्ये आढळला पहिला रुग्ण. असे मानले जाते की, १९व्या शतकात पहिल्यांदाच एड्सची लागण झाली होती. आफ्रिकेतील माकडांच्या विशिष्ट प्रजातीमध्ये एड्स चे विषाणू आढळले. हा रोग माकडांच्या माध्यमातून माणसांमध्ये पसरला. वास्तविक आफ्रिकेतील लोक माकडे खात असत, त्यामुळे माकडं खाल्ल्याने हा विषाणू मानवी शरीरात शिरला असावा, असे म्हटले जाते. सन १९५९मध्ये एचआयव्ही विषाणू पहिल्यांदा एका आजारी कॉंगोली माणसाच्या रक्ताच्या नमुन्यात त्याच्या मृत्यूनंतर आढळून आला. तो पहिला एचआयव्ही बाधित व्यक्ती असल्याचे मानले जाते. किन्शास हे त्या काळात देहव्यापाराचे केंद्र होते. अशा प्रकारे हा रोग देहव्यापार आणि इतर मार्गांनी इतर देशांत पोहोचला. सन १९६०मध्ये हा रोग आफ्रिकेतून हैती आणि कॅरिबियन बेटांवर पसरला. वास्तविक, हैतीयन लोक कॉंगोच्या वसाहती लोकशाही प्रजासत्ताकमध्ये काम करत असत. जिथे स्थानिक पातळीवर शारीरिक संबंधांमुळे हा आजार इतरांमध्ये पसरला. जेव्हा ते त्यांच्या घरी परतले, तेव्हा विषाणू त्यांच्याबरोबर हैतीला गेला. त्यानंतर १९७०च्या दशकात हा विषाणू कॅरिबियन ते न्यूयॉर्क शहरापर्यंत पसरला आणि नंतर अमेरिकेपासून उर्वरित जगामध्ये पसरला. पुढे १९८०नंतर हा रोग जगभर खूप वेगाने पसरला. तेव्हापासून जगभरातील लाखो लोकांना एड्समुळे आपला जीव गमवावा लागला आहे.

यावर्षीच्या जागतिक एड्स दिनाची थीम, लेट कम्युनिटीज लीड, एड्सनं बाधित समुदायांना नेतृत्व भूमिका घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा उद्देश आहे. ही थीम एड्सनं बाधित झालेल्या लोकांना आवाज उठवण्यास आणि त्यांचं जीवन सुधारण्यासाठी कृती करण्यास सक्षम असण्याची गरज अधोरेखित करते. एड्स बाधित लोकांना आरोग्य सेवा, शिक्षण आणि समान रोजगाराच्या संधी मिळायला हव्यात. जेणेकरुन डब्ल्यूएचओ अनुसार या थीमचा उद्देश पूर्ण होऊ शकेल.

**!! आंतरराष्ट्रीय एड्स जागरूकता दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व सुलेखन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरुजी**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

## वितर्क..

सत्तास्थापना उशीर
निघाले तर्क वितर्क
कुणा कुठली खाती
समस्त अत्यंत गर्क

सल्ला मस्लत चाले
राजकारणाचे अर्क
गुप्तउघड भेटीगाठी
रात्रीअपरात्री संपर्क

टपून राही विरोधक
करत विचीत्र वितर्क
काय असे भवितव्य
कसे असेलं रे उदर्क

सर्व गुंतले चिंताग्रस्त
म्हातारे न् तरूणतुर्क
राज्यशकट अडखळे
कुणा ना पडला फर्क

जनतेनी यंदा दिलेले
भरघोस यशाचे मार्क
आक्रित काय घडले
विरोधक लढवी तर्क

अतर्क्य लागे निकाल
बसला दणकून जर्क
जाणवे चेहरानेत्यांचा
निखळून पडला वर्ख

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# पराभवाच्या धक्क्याला थांबवुन नव्या संकल्पाची सुरूवात!




**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.३०, कर्जत :** पराभवाने खचुन न जाता नव्या निर्धाराने नव्या संकल्पाचा आरंभ करणाऱ्या सुधाकर घारे यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तन विकास आघाडीने 'रडायचं नाही, लढायचं' या ब्रीदवाक्याने पुन्हा एकदा झंझावाती हाक दिली आहे. कर्जत येथील रॉयल गार्डन हॉलमध्ये सकाळी ११ वाजता 'नव संकल्प सभेचे' आयोजन करण्यात आले होते, ज्यात कर्जत-खालापुर विधानसभा मतदारसंघाच्या राजकीय वर्तुळात सळसळ निर्माण करणारा उत्साह दिसुन आला.

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे आणि महाविकास आघाडीचे नितीन सावंत यांच्या तगड्या आव्हानासमोर परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार सुधाकर घारे यांनी मोठ्या निर्धाराने, जनतेचा आशीर्वाद घेत, आपला प्रचार केला. पण थोडक्याच मतांनी पराभव स्विकारावा लागला. या पराभवाने घारे खचले नाहीत. उलट नव्या निर्धाराने, नव्या संकल्पांसह जनतेसमोर उभे राहून रडायचं नाही, लढायचं! या आवाहनाने नव संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी अशोक भोपतराव, भरत भगत, भगवान भोईर, भगवान चंचे, अंकित साखरे, राजेंद्र निगुडकर, भाई विलास थोरवे, सुनील गायकवाड, संतोष बैलमारे, रंजना धुळे आणि पूजा सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांच्या उत्साही आणि प्रेरणादायी भाषणांनी वातावरण भारावून गेले. पराभव म्हणजे शेवट नव्हे, तर नव्या विजयाची सुरुवात आहे, या विचारावर सर्वांची एकवाक्यता होती.

सुधाकर घारे यांनी जनतेशी थेट संवाद साधताना स्पष्ट केले की, पराभव हा विजयाच्या दिशेने पहिला पाऊल असतो. आपल्याला आता थांबायचं नाही. पराभवाने शिकवण मिळाली आहे, तो शिकुन नव्या जोमाने आपल्याला पुढे जावे लागणार आहे. माझे ध्येय अजूनही स्पष्ट आहे, आणि आपली लढाई अजुन संपलेली नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या प्रेरणादायी वक्तव्यांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तन विकास आघाडीचे कार्यकर्ते नव्या संकल्पाने एकत्र येऊन पुढील रणधुमाळीत उतरतील, असा विश्वास जनतेला वाटला.

सभेत मान्यवरांनी सुधाकर घारे यांचे कौतुक करीत, त्यांचा लढाऊ बाणा आणि जनसेवेची तळमळ उधळून दिली. अशोक भोपतराव यांनी सुधाकर घारे यांनी दिलेला संदेश प्रत्येकाला प्रेरणा देईल, पराभवाने घाबरून मागे हटायचे नाही. ते लढवय्ये आहेत, असे म्हटले. भरत भगत, भगवान भोईर आणि बाकीच्या मान्यवरांनीही त्याच विचारांना पाठिंबा दिला.

या सभेत विशेषतः महिलांचा आणि तरुणांचा सहभाग लक्षवेधी ठरला. पूजा सुर्वे आणि रंजना धुळे यांनी महिला सक्षमीकरणाबद्दल आपले विचार मांडले. नव्या युगात महिलांची भुमिका महत्त्वाची आहे आणि या नव संकल्पाच्या लढाईत महिलांना पुढे येणं गरजेचं आहे, असे त्यांनी म्हटले. तरुणांनीही या सभेत जोशाने सहभाग नोंदवून परिवर्तनाचा ध्वज उंचविण्याचे वचन दिले. सभेचा समारोप होताना सुधाकर घारे यांनी स्पष्ट केले की, ही सभा नव्या सुरुवातीचे प्रतीक आहे. रडण्याचा काळ संपला, आता फक्त लढाई आहे. जनता आपल्यासोबत आहे आणि आगामी निवडणुकीत आपण नक्की विजय मिळवु, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुधाकर घारे यांच्या नेतृत्वाखाली झालेली ही सभा परिवर्तन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांसाठी ऊर्जेचा स्रोत ठरली आहे. ज्या जोशाने आणि आत्मविश्वासाने त्यांनी आपले विचार मांडले, त्याने जनतेलाही नव्या संकल्पासाठी उभे केले. यापुढील राजकीय वाटचालीत परिवर्तन विकास आघाडीचे नाव नक्कीच घेतले जाईल, असे दिसते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** २०२३/२०२४ या गळीत हंगामात मौजे देसवडे, मांडवे खुर्द, आणि परिसरातून शेतकऱ्यांचा ऊस मोठया प्रमाणात माळकुप येथिल ग्रीन एनर्जी लिमिटेड या कारखान्यास देण्यात आला होता. ऊसाची तोडणी करण्या अगोदर कारखान्याचे एम डी यांनी गावा-गावात मीटिंग घेऊन शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, तुमच्या ऊसाला ईतर कारखान्या प्रमाणे दर देऊ पण मागिल हिशोब बाकी असतानाच चालू हंगामातील ऊस तोड चालु केली आहे. शेजारील संगमनेर कारखान्याने अंतिम दर ३००० रु दर दिला आहे, तरी आपण दिलेल्या शब्दाप्रमाने उर्वरीत २०० रू. टणा प्रमाणे शेतकऱ्यांना पैसे देण्यात यावे. तसेच चालू वर्षीचा कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला असून कारखान्याने कोणत्याही प्रकारे दर जाहीर न करता ऊस तोड चालु केली आहे. त्यामूळे शेतकरी संभ्रमाअवस्थेत आहे तरी आपण चालू हंगामाचा दर जाहीर करून मगच ऊस तोड सुरू करावी. दोन्ही मागण्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा. या मागणीचे निवेदन भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे चेअरमन महेश करपे यांना देण्यात आले. यावेळी सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, दत्ता फटांगरे, चेअरमन संजय भोर, अविनाश भोर, संतोष काकडे, संपत फटांगरे, अण्णा भोर, भाऊसाहेब खाडे, मंजाबापू वाडेकर, बाबासाहेब टेकुडे, रावसाहेब गोळे, महिपती दरेकर, नवनाथ जाधव यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त डॉ.ओक आज करणार ६५ बालकांच्या मोफत शस्त्रक्रिया



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, मुंबई :** शहापूरच्या आदिवासी विभागातून शहापूर उपजिल्हा रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहाबाहेर ११ बालके शस्त्रक्रियेसाठी आली होती. मानेला जन्मजात गाठ असलेल्या बाळापासून ते हायड्रोसिल तसेच जीभ टाळूला चिकटलेल्या बाळांच्या शस्त्रक्रिया करायच्या होत्या. शहापूर उपजिल्हा रुग्णालयात विख्यात बालशल्य चिकित्सक डॉ.संजय ओक व त्यांच्या पथकाने एकापाठोपाठ एक या ११ बालकांच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या. निमित्त होते डॉ.संजय ओक यांच्या वाढदिवसाचे.२४ नोव्हेंबर हा डॉ.ओक यांचा वाढदिवसखरतर त्याचदिवशी ६५ शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित केले होते. मात्र महाराष्ट्रतील विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर उर्वरित शस्त्रक्रिया १ डिसेंबरोजी पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले. ठाणे जिल्हा रुग्णालयात १ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून डॉ.संजय ओक तसेच पालिकेच्या शिव रुग्णालयातील त्यांचे सहकारी डॉक्टर आणि ठाणे जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांसह आवश्यक कर्मचारीवर्ग शस्त्रक्रिया करणार आहेत. रात्री साडेदहापर्यंत या शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी सांगितले. यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यामधून ठाणे जिल्हा रुग्णालयात बालकांना शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात येत असल्याचे डॉ.संकेत कुलकर्णी यांनी सांगितले.

आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत मुरबाड, शहापूर, जव्हार, ठाणे तसेच नवी मुंबईतून या बालकांची निवड करण्यात आल्याचे डॉ.कुलकर्णी म्हणाले. केईएमचे अधिष्ठाता व पालिकेच्या सर्व रुग्णालयांचे संचालक म्हणून १३ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले डॉ. ओक हे वर्षाकाठी शासनाच्या विविध ग्रामीण रुग्णालयात तसेच इमेरीटस प्रोफेसर म्हणून पालिकेच्या शीव रुग्णालयात जाऊन सुमारे एक हजार बालकांच्या शस्त्रक्रिया करतात. यासाठी ते फुटकी कवडीची कोणाकडून घेत नाहीत. केईएमचे अधिष्ठाता व महापालिका रुग्णालयांचे संचालक म्हणून निवृत्त झाल्यानंतर डी.वाय.पाटील संस्थेत कुलगुरू म्हणून डॉ.ओक यांनी काम पाहिले. तसेच प्रिन्स अलिखान हॉस्पिटलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. करोनाच्या काळात राज्य शासनाने नियुक्त केलेल्या ‘कोविड टास्क फोर्स’चे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य अमूल्य म्हणावे लागेल. सध्या ठाण्यातील कौशल्या हॉस्पिटलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ते काम करत असून केईएममधून निवृत्त झाल्यानंतर एकाही रविवारी सुट्टी न घेता डॉ संजय ओक हे आदिवासी भागातील तसेच गोरगरीब लहान मुलांच्या शस्त्रक्रिया करतात.

## थंडीच्या लाटेमुळे भाजी काढणीसाठी विलंब झाल्याने आवक घटली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, ठाणे :** यंदा परतीचा पाऊस लांबल्यामुळे भाज्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होऊन त्यांचे उत्पादन घटले होते. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा भाज्यांच्या पिकाची लागवड करण्यात आली. परंतु सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण भाज्यांच्या वाढीस पूरक नसल्यामुळे भाजी काढणीसाठी तयार होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे बाजारात काही भाज्यांची आवक घटली असून त्यांच्या दरात वाढ झाल्याचे चित्र आहे.

नवी मुंबई येथील वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत पुणे, जुन्नर, नगर, सातारा, बारामती अशा विविध जिल्ह्यांतून भाज्या दाखल होतात. या बाजार समितीतून या भाज्या ठाणे, मुंबई तसेच उपनगरातील किरकोळ बाजारात विक्रीसाठी जातात. नियमित बाजार समितीत अंदाजे ५५० ते ६०० भाज्यांच्या गाड्या दाखल होत असतात. गेले काही दिवसांपासून बाजार समितीत दुधी भोपळा, गवार, कोबी, दोडका, वांगी, शेवगा या भाज्यांची आवक घटल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या दरात १० ते २० टक्के वाढ झाली आहे. परिणामी, किरकोळ बाजारातही या भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या राज्यात सर्वत्र थंडीची लाट पसरली आहे. हे वातावरण काही भाज्यांच्या वाढीसाठी पूरक नसल्यामुळे या भाज्यांची वाढ होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे भाज्यांचे उत्पादन घटल्याची माहिती नवी मुंबईचे घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब बडदे यांनी दिली.

# विधानसभेनंतर वेड लागले कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे...

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.३०, किनवट (नांदेड) :** विधानसभेच्या निवडणुकीनंतर आता वेध लागले जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषदेच्या निवडणुकीचे. विभानसभा निवडणुकीत मतदारांचा ताजा मिळालेला कौल हा सार्वजनिक संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाला वातावरण अनुकूल असल्याचे अनुमान लावला जात आहेत. भाजपा महायुतीच्या आमदारांसमोर इच्छुकांची तोब्बा गर्दी असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीच्या प्रदीप नाईकांसमोर विश्वासू नविन चेहरे देण्यासाठी ताकही फुंकून पिण्याची वेळ आल्याचे दिसते.




२०१७ मध्ये पार पडलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजपा दोन, राष्ट्रवादी काँग्रेस पाच आणि काँग्रेस एक असे पक्षीय बलाबल होते. आमदार प्रदीप नाईकांच्या काळात ही निवडणूक पार पडली. अती प्रदीर्घ कालखंडानंतर आमदार भीमराव केरामांच्या नेतृत्वाखाली २०२५ मध्ये होणार्या निवडणुकीत महायुती किती जागा जिंकणार..? आणि माजी आमदार प्रदीप नाईकांच्या नेतृत्वात काय बदल होणार होणार..?

याकडे तमाम विधानसभा मतदारसंघवाशियांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. २०१७ मध्ये पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत वाई गटातून समाधान जाधव राष्ट्रवादी काँग्रेस, (सर्वसाधारण), वानोळा गटातून संजय राठोड काँग्रेस (नागरीकांचा मागास प्रवर्ग), उमरी गटातून सुनयना विशाल जाधव राष्ट्रवादी काँग्रेस (सर्व साधारण स्त्री), मांडवी गटातून मधूकर राठोड राष्ट्रवादी काँग्रेस (सर्वसाधारण), गोकुंदा गटातून संगिता प्रविण मॅकलवार राष्ट्रवादी काँग्रेस (नागरिकांचा मागास प्रवर्ग), बोधडी गटातून सुनंदाबाई ओमप्रकाश दहिफळे राष्ट्रवादी काँग्रेस (सर्वसाधारण स्त्री), जलधरा गटातून कमल भगवान हुरदुके भाजपा (सर्वसाधारण स्त्री), इस्लापूर गटातून सूर्यकांत आरेंडकर भाजपा (सर्वसाधारण) यांची वर्णी लागली होती.

मागच्या पक्षीय बलाबलला छेद देऊन यावेळी भाजपा महायुती इतिहास घडवणार काय..? कारण विधानसभा निवडणुकीतील मतदारांचा मूड पहाता महायुतीला अनुकूल दिसत आहे. बोधडी गटात भाजपातील इच्छुक दिग्गजांची गर्दी होणार आहे. संदीप केंद्रे, बाबूराव केंद्रे अशा अनेकांची उमेदवारी आमदारांसमोर डोकेदुखी ठरण्याची शक्यता नाकारुन चालणार नाही.

# जिल्ह्यातील क्रीडा संकुलासाठी निधीची मागणी

## खासदार निलेश लंके यांचे केंद्रीय मंत्री मांडवी यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** नगर शहरातील वाडिया पार्कसाठी २० कोटी तर पारनेर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड व शेवगांव या तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी प्रत्येकी ५ कोटींच्या निधीची मागणी खा.लंके यांनी केली असून हा निधीही मार्च महिन्यात मंजुर करण्याची ग्वाही केंद्रीय श्रम, रोजगार, युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्री डॉ.मनसुख मांडविया यांनी दिल्याचे खा.नीलेश लंके यांनी सांगितले.

नगर शहरातील वाडिया पार्क तसेच विविध तालुक्यांतील क्रिडा संकुल किंवा त्यात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खा.लंके यांनी नवी दिल्ली येथे खा.भास्कर भगरे यांच्यासह मंत्री मांडविया यांची भेट घेतली. यासंदर्भात लंके यांनी मांडविया यांना दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर शहरातील वाडिया पार्क हे जिल्हयातील एकमेव प्रमुख क्रीडा संकुल आहे.

या संकुलामध्ये अनेक सुविधांची आवश्यकता असून काही सुविधांअभावी विस्तृत आणि मोठे क्षेत्रफळ असूनही या संकुलापासून खेळाडू उपेक्षित राहत आहेत. वाडिया पार्क विकसित करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास एक गुणवत्तापुर्ण क्रीडा संकुल उभे राहील. त्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन मिळू शकेल असा विश्वास खा.लंके यांनी व्यक्त केला आहे. नगर शहराबरोबरच पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगांव या तालुक्यांमधील क्रीडा संकुलांमध्येही विविध सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्रीडा संकुल असूनही ग्रामीण भागातील खेळाडूंना



त्याचा लाभ घेता येत नाही. मंत्री मांडविया यांनी या मागणीचा विचार करून निधी मंजुर करण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी केली. खा.लंके यांच्या मागणीचा विचार करून येत्या मार्च महिन्यात ४५ कोटींच्या निधीला मंजुरी देण्याची ग्वाही मंत्री मांडविया यांनी दिल्याचे खा.लंके यांनी सांगितले.

# धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचे २५ टक्के काम पूर्णत्वाकडे - आ.पाटील

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.३०, धाराशिव :** ठाकरे सरकारने राज्याच्या हिश्शयाचा वाटा न दिल्यामुळे रखडलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या कामाला आता मोठी गती आली आहे. धाराशिव-तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर कामापैकी साधारणपणे आठ किलोमीटर अंतराचे काम मोठ्या वेगात सुरू आहे.जवळपास २५ टक्के काम पूर्णत्वाकडे आले असून या मार्गावर एकूण लहान-मोठे एकूण ५० पूल असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या पहिल्या टप्प्यातील २५ टक्के काम पूर्णत्वाच्या दिशेने आले आहे. सध्या तीन टप्प्यात काम सुरू आहे. त्यानुसार खोदकाम, भराव आणि पुलांच्या कामांना हाती घेण्यात आले आहे. धाराशिव ते तुळजापूर या ३० किलोमीटर अंतरावर एकूण १७ मोठे पूल असणार आहेत. तर ३३ छोटे पूल साकारले जाणार आहेत. एकूण ५० छोटे-मोठे पूल ३० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यात रेल्वे स्थानकाजवळ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या नकाशांचे काम अंतिम टप्प्यात आहे.

पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटरच्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी ५४४ कोटी रूपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. या मार्गावरील अन्य पुलांच्या कामांना डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच हाती घेतले जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

ठाकरे सरकारने राज्याच्या वाट्याचा हिस्सा नाकारल्यामुळे रखडलेल्या कामांना महायुती सरकारकडून निधीची उपलब्धता करून देण्यात आल्यानंतर मोठी गती आली आहे. उपळा ते सांजा आणि पुढे पळसवाडीपर्यंत साधारणपणे आठ किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचे खोदकाम आणि भरावाचे काम पूर्णत्वाच्या टप्प्यात आले आहे. त्यामुळे ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणे दोन वर्षांच्या आत रेल्वेमार्ग तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचेल असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील कामाचे दोन स्वतंत्र टप्पे केले आहेत.

या रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल असणार आहेत. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्यात आली आहे. संपादीत जमिनीच्या वाढीव मावेजासाठी दोन्ही जिल्ह्यातील जिल्हाधिकार्यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आहेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे.

सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे. या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे.

मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी नुकतेच नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २१ कोटी रुपयांचा निधी सुपूर्द केला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

### युध्द पातळीवर काम सुरु

सध्या खोदकाम आणि भरावाचे काम वेगात सुरू आहे. नियोजित उद्दिष्टानुसार युध्द पातळीवर काम सुरू असल्याने पुढील आठवड्यापासून या मार्गावरील पुलांच्या कामांना सुरूवात होणार आहे. भरावानंतर ब्लँकेटींग त्यानंतर बलास म्हणजेच खडी अंथरण्याचे कामही हाती घेतले जाणार आहे. ते पूर्ण होताच स्लीपरच्या कामाला सुरुवात होईल. स्लीपरचे काम जसजसे पुढे जाईल, तसतसे रेल्वेची मुख्य पटरी अंथरण्याचे काम हाती घेतले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

# धनंजय बागडे अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त

**अक्षराज : वृत्तसंकलन.**

**दि.३०, पुणे :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालयात कार्यालय अधीक्षक धनंजय बागडे यांचा सेवा निवृत्ती गौरव समारंभ दिनांक ३० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे यांच्या हस्ते धनंजय बागडे यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना पुष्पगुच्छ शाल श्रीफळ मानपत्र व संपूर्ण पोशाख देण्यात आला.धनंजय बागडे यांनी प्रशासकीय कामकाजात दिलेले योगदान महत्त्वाचे असून त्यांची सचोटी व प्रामाणिकपणाने ३३ वर्ष ३ महिने काम केले. केलेल्या कामाचे समाधान मिळाले पाहिजे आणि यापुढे बागडे यांनी कुटुंबासाठी अधिक वेळ देऊन पुढील आयुष्य आनंदात व्यतीत करावे अशा शुभेच्छा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे यांनी दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.नितीन घोरपडे यांनी बागडे यांचा अकाउंटमध्ये हातखंडा होता. त्यांनी नवीन असलेल्या संगणक व ई टी एच प्रणाली अवगत करून त्यांचा प्रशासनात प्रभावीपणे वापर केला. त्यांच्याकडून इतर महाविद्यालय मदत घेत होते आपण आपल्या कामात किती निष्णात असावे याचे उदाहरण म्हणजे बागडे आहेत असे सांगत त्यांच्या कामकाजाचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना धनंजय बागडे यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने मला शिक्षण क्षेत्रात काम करण्याची संधी दिली. विद्यार्थी हा केंद्रबिंदू म्हणून प्रामाणिकपणे काम केल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे ऋण व्यक्त केले.याप्रसंगी हेमंत सावंत, युवराज शेवते, मेघना मॅडम, डॉ लतेश निकम, हरी सोळंकी, शंकर अळकुंटे, शिवाजी सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर आर वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर स्टडीज संचालक सचिन भारद्वाज उपप्राचार्य डॉ. शुभांगी आवटे, डॉ.प्रशांत मुळे, प्रा अनिल जगताप, प्रा विलास शिंदे तसेच शिक्षक शिक्षकेतर, इतर सेवक तसेच बागडे यांचा मित्रपरिवार व नातेवाईक उपस्थित होते. डॉ.दत्तात्रय संकपाळ यांनी मानपत्राचे वाचन केले तर सूत्रसंचालन डॉ.वंदना सोनवले यांनी केले आणि उपप्राचार्य डॉ.मुळे यांनी आभार मानले.

# नेतृत्वाने टाकलेला विश्वास मी कार्यकर्त्यांवर सोपवला - आ.दाते

## कान्हुरपठार येथे दातेंचा सत्कार समारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील कान्हुरपठार येथे महायुतीचे नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते यांचा सत्कार समारंभ व मतदारांचे आभार कार्यक्रम प्रसंगी आमदार दाते बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजप कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, वसंतराव चेडे, बी.एल.ठुबे, सुनील थोरात प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले, माझ्या छोट्या छोट्या कार्यकर्त्यांनी एवढी मेहनत घेतली की मी कधीही विसरू शकत नाही. मी गेल्या ४० वर्षापासून ज्या ज्या नेतृत्वाबरोबर काम केले. त्यांच्यावर जो विश्वास टाकला तसाच विश्वास मी तुमच्यावर टाकला. कान्हुर गाव स्वर्गीय बाबासाहेब ठुबे यांचे आचार विचारांचे आहे. माझी राजकीय सुरुवात पारनेर सहकारी साखर कारखाना संचालक निवडणुकीतून झाली. कै.कॉ.बाबासाहेब ठुबे, कै. आ.वसंतराव झावरे, कै.गुलाबराव शेळके, कै.बाबासाहेब कवाद यांनी मला या निवडणुकीत उभे केले होते. ही निवडणूक आम्ही १८ झिरोने जिंकली होती.

कारखाना चांगला चालवला परंतु आपण दुष्काळी तालुक्यात आहे साधारण २-३ वर्षांनी आपल्याला पावसाची टंचाई येते. ही परिस्थिती बदलण्यासाठी कै.कॉम्रेड बाबासाहेब ठुबें पासून कै. वसंतराव झावरे, नंदकुमार झावरे तसेच विजय औटी यांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु मधल्या पाच वर्षात हे सगळं राजकारण बदललं विकासाचं राजकारण राहिलं नाही. दहशतीच, दादागिरीच राजकारण आलं लोकसभेच्या निकालानंतर अहंकारी प्रवृत्ती निर्माण झाली. मागील पाच वर्षात कितीतरी जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

या निवडणुकीत मला उमेदवारी मिळेल का नाही. याची खात्री नव्हती. परंतु मिळाल्यास लढायचं मी ठरवलं होतं. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अवघे १३ दिवस मला प्रचारातला मिळाले. परंतु मला सामान्य माणसाचा सूर कळाला होता ज्यांच्यावर अन्याय झाला. त्यांची मानसिकता मला कळली होती आणि त्याच जोरावर निवडणुकीला सामोरे जायचं मी ठरवलं होतं. माझ्या पक्षाचे नेते माननीय अजित दादा यांनी यापूर्वीही माझ्यावर विश्वास टाकला होता. माझ्यावर जो अन्याय झाला होता त्यास संधी देण्याचा मला अजित दादांनी ठरवलं होतं. त्यांनी माझ्यावर विश्वास टाकला मी माझ्या जनतेवर कार्यकर्त्यांवर विश्वास टाकला मला खात्री आहे आपण मला मतदान करून माझ्यावर विश्वास टाकला त्यातून मी कधीही उतराई होऊ शकत नाही. मी तुमचा कायमचा ऋणी राहील. मी बाजार समितीत ८ वर्ष सभापती म्हणून काम पाहिलं तुम्हा सर्वांना माहित आहे. मी सभापती झालो तेव्हा बाजार समितीचे उत्पन्न २५ लाख रुपये वार्षिक असतानाही मी त्या बाजार समितीचे उत्पन्न साडेतीन कोटींवर नेऊन ठेवलं महाराष्ट्रातल्या प्रमुख बाजार समितीमध्ये पारनेरची बाजार समिती नेऊन ठेवली. २ वर्ष मला जिल्हा परिषदेचा बांधकाम समिती सभापती म्हणून काम करण्याची संधी मिळाली. परंतु बांधकाम समिती काय असते संपूर्ण पारनेर तालुक्यासह जिल्ह्याला माझ्या कामाच्या माध्यमातून माहिती केले.

पठार भागाचा पाण्याचा प्रश्न आहे मी जबाबदारीने सांगतो माझी विधान मंडळात सदस्य म्हणून शपथ झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून या प्रश्नाकडे लक्ष देणार एक महिन्याच्या आत संबंधित खात्याचे अधिकारी व मंत्री महोदयांची मीटिंग लावणार असल्याचेही आमदार दाते यांनी सांगितले.



पाणी प्रश्न सोडणार मला तुम्हाला हेच सांगायचे राजकारणाच्या जागेवर राजकारण करा, पण पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर राजकारण करू नका, कोणीही असो सर्वांना बरोबर घेऊन या प्रश्नावर काम करायचं, सुदैवाने केंद्रात व राज्यात दोन्ही ठिकाणी आपणच आहे आता आपल्याला दुसऱ्याची मदत मागण्याची गरज नाही. तालुक्यात ही आमदार आपलाच आहे. मधल्या काळात जी पोकळी निर्माण झाली तालुक्याच्या सुसंस्कृतीत बदल झाला, पाणी प्रश्न सोडवण या पुढील काळात प्राधान्याने करावे लागेल.

**- विश्वनाथ कोरडे, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य.**

# थोडक्यात

## उदगीर तालुक्यात थंडीचा पारा वाढल्यामुळे उबदार कपड्यांची मागणी वाढली



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.३०, उदगीर (लातूर) :** गेल्या दोन दिवसांपासून उदगीर तालुक्यातील थंडीचा कडाका चांगलाच वाढला आहे. अचानक हवामानात बदल होऊन वातावरणात कमालीचा गारवा आला आहे. सकाळी आणि रात्री बोचणारी थंडी आता दुपारी देखील कापरे भरत असल्याने थंडीपासून संरक्षण करण्यासाठी गरम कपडे घालण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. त्याचप्रमाणे थंडीपासून दिलासा मिळावा यासाठी जागोजागी शेकोट्या पेटवल्या जात आहेत. गेल्या काही दिवसांपासून गायब झालेल्या थंडीचे आगमन झाले आहे. थंडीचा कडाका वाढल्याने उदगीर तालुका गारठला आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या अंगावर उबदार कपडे दिवस रात्र दिसून येत आहेत. बाजारात उबदार कपड्यांची मागणी वाढली आहे. जागोजागी ऊब मिळवण्यासाठी ग्रामीण भागात शेकोट्या पेटविल्या जात आहेत. ग्रामीण भागामध्ये वातावरणाच्या बदल्यामुळे सर्दी खोकला ताप याचे रुग्णा मध्ये कमालीची वाढ झाली आहे.

## जिल्ह्यात दि.१४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, ठाणे :** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. ईश्वर सुर्यवंशी यांनी केले आहे.

न्या. ईश्वर सुर्यवंशी म्हणाले की, लोक अदालत च्या निवाड्याविरुध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो. लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपआपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते. लोक अदालतचे महत्व लक्षात आल्याने यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतींमध्ये ठाणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून राष्ट्रीय लोक अदालतचा फायदा पक्षकारांना मिळाला आहे. तरी आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाची आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे सचिव न्या. ईश्वर सुर्यवंशी यांनी केले आहे.

## सावतामाळी मित्रमंडळाच्या वतीने महात्मा फुले यांना अभिवादन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथे श्री संत सावतामाळी तरुण मित्र मंडळ व श्री संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले चौक येथे महात्मा फुले यांच्या १३४ व्या स्मृती दिनानिमित्त महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य, बापूसाहेब रांधवण, अविनाश रांधवण, आदित्य रांधवण, ओम रांधवण, योगेश रांधवण, सुशांत लोंढे, यशवर्धन गागरे, सागर रांधवण, संभाजी मेहेर, जय रांधवण, गणेश रांधवण, संपत रांधवण, सेवा सोसायटीचे व्हाईस चेअरमन मोहनराव रांधवण, भाऊसाहेब रांधवण, अक्षय लोंढे, तेजेस लोंढे, दिनेश रांधवण, संतोष शिंदे, तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पीकांच्या पीक स्पर्धा रब्बी हंगाम २०२४

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, ठाणे :** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल.

तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

**शासन निर्णय क्र.पीकस्पर्धा** - २०२०/प्र.क्र.११३/४अे, दि.२० जुलै २०२३ अन्वये रब्बी हंगाम २०२४ मध्येही पीकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

१) पीकस्पर्धेतील पीके : रब्बी पीके - ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस (एकूण ५ पिके).

२) पात्रता निकष : स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल.

पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

३) अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे : विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ)

ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन ७/१२, ८-अ चा उतारा.

जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा

४) अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख : रब्बी हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख पुढील प्रमाणे राहिल.

ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस - ३१ डिसेंबर

तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिकस्पर्धा निकाल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

५) स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क :

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३००/- राहील व आदिवासी गटासाठी रक्कम रु.१५०/- राहील

**६) बक्षिस स्वरुप : स्पर्धा पातळी :**

१) तालुका पातळी - सर्वसाधारण व आदिवासी गट पहिले बक्षिस रुपये - रु.५ हजार, दुसरे बक्षिस - रु.३ हजार, व तिसरे बक्षिस - रु.२ हजार.

२) जिल्हा पातळी - सर्वसाधारण व आदिवासी गट पहिले बक्षिस रुपये - रु.१० हजार, दुसरे बक्षिस – रु.७ हजार, व तिसरे बक्षिस - रु.५ हजार.

३) राज्य पातळी - सर्वसाधारण व आदिवासी गट पहिले बक्षिस रुपये - रु.५० हजार, दुसरे बक्षिस - रु.४० हजार, व तिसरे बक्षिस - रु.३० हजार..

उपरोक्त नमुद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. पीकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधुभगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी, असे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी कळविले आहे.

# नदीत बुडून एका विद्यार्थ्याचा मृत्यू, तिघे बचावले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, गडचिरोली :** शहरापासून जवळ असलेल्या वैनगंगा नदीच्या बोरमाळा घाटातील पाण्यात बुडून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर सुदैवाने यातील तिघे थोडक्यात बचावले. ही घटना ३० नोव्हेंबरला दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, उत्तरीय तपासणीला विरोध करत नातेवाईकांनी मृत मुलाचे शव जिल्हा रुग्णालयातून नेले.

जयंत आझाद शेख (१०,रा. तेली मोहल्ला, हनुमान वॉर्ड, गडचिरोली) असे मृत मुलाचे नाव आहे. रियाज शब्बीर शेख (१४), जिशान फय्याज शेख (१५), लड्डू फय्याज शेख (१३, सर्व रा. तेली मोहल्ला, हनुमान वॉर्ड, गडचिरोली) हे बालंबाल बचावले. हे सर्व जण मिळून ३० नोव्हेंबरला दुपारी शहराजवळील बोरमाळा नदीघाटावर फिरण्यासाठी गेले होते. सोबत जिशान व लड्डू यांची आई ताजु शेख या देखील सोबत होत्या. वैनंगगा नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह कमी झालेला आहे.

पण पात्रातील खोल पाण्याचा अंदाज न आल्याने मौजमजा म्हणून उतरलेली चारही मुले एकापाठोपाठ एक बुडाली. दरम्यान, यातील जयंत शेख यास जिल्हा रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी तपासणी करुन मृत घोषित केले. इतर तिघे जिल्हा रुग्णालयात उपचारास आल्याची नोंद नाही. या घटनेनंतर हनुमान वॉर्डातील तेली गल्लीत मोठी गर्दी झाली होती. याबाबत गडचिरोली पोलिस ठाण्यात उशिरापर्यंत नोंद झाली नव्हती.

**आईच्या हिमतीमुळे तिघांचे वाचले प्राण**

चारही मुले बुडाल्यानंतर त्यांनी आरडाओरड सुरू केली. नदीकाठावर असलेल्या ताजु फय्याज शेख यांनी धावत जाऊन पाण्यात उडी घेतली. हिंमत दाखवत त्यांनी एकटीने जिशान, लड्डू या आपल्या दोन मुलांसह रियाज यास बाहेर काढले, पण पाण्याच्या प्रवाहात वाहत गेलेल्या जयंत शेख यास वाचविण्यात त्यांना यश आले नाही. यावेळी मदतीसाठी काही मच्छीमार धावले. त्यांनी जयंत यास बाहेर काढले.



मात्र, दवाखान्यात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. इतर तीन मुले सुखरूप वाचली.

**नातेवाईकांचा जिल्हा रुग्णालयात गोंधळ**

जयंत शेख याच्या मृत्यूनंतर जिल्हा रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना माहिती कळवून शवविच्छेदन करण्याची तयारी केली. मात्र, नातेवाईक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. २० ते २५ नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात गोंधळ घालून सुरक्षारक्षक, परिचारिकांशी हुज्जत घातली. त्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन तो दुचाकीवरुन नेला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

# नाशिकमध्ये नोव्हेंबरमधील ८ वर्षातील सर्वात थंड दिवस

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, नाशिक :** शहरात कडाक्याच्या थंडीने मुक्काम ठोकला असून घसरणाऱ्या तापमानाने शनिवारी ८.९ अंश ही हंगामातील नीचांकी पातळी गाठली. निफाडच्या कृषी विज्ञान केंद्रात या दिवशी आठ अंशाची नोंद झाली. मागील आठ वर्षात नोव्हेंबरमधील शनिवार हा शहरातील सर्वात थंड दिवस ठरला. याआधी २०१६ मध्ये नोव्हेंबर महिन्यात ८.८ अंशाची नोंद झाली होती.

नोव्हेंबरच्या मध्यानंतर तापमानात बदल होऊन पंधरवड्यात तापमान जवळपास आठ अंशांनी कमी झाले आहे. उत्तरेकडून वाहणाऱ्या वाऱ्याचा प्रभाव स्थानिक वातावरणावर पडतो. एरवी डिसेंबर, जानेवारीत कडाक्याच्या थंडीची अनुभूती मिळते. यंदा नोव्हेंबरमध्ये तशी स्थिती निर्माण झाली आहे. सोमवारपासून घटणाऱ्या तापमानाची शृंखला शनिवारी कायम राहिली. सलग पाचव्या दिवशी पारा खाली उतरला. आदल्या दिवशीच्या तुलनेत तापमानात १.७ अंशांनी घट होऊन ते ८.९ या नीचांकी पातळीवर आले. हवामानशास्त्र विभागाच्या नोंदीनुसार मागील आठ वर्षात नोव्हेंबरमधील हे सर्वात नीचांकी तापमान आहे. सर्वत्र कमालीचा गारठा पसरला आहे. दिवसाही तो जाणवतो. थंडीमुळे जॉगिंग ट्रॅक व व्यायामशाळेत गर्दी वाढली आहे. सकाळी उबदार कपड्यांशिवाय बाहेर पडता येत नाही. ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्या आहेत. ग्रामीण भागात थंडीची तीव्रता अधिक आहे. हवामानशास्त्र विभागाच्या नोंदीनुसार ११ नोव्हेंबर २०१६ रोजी शहरात ८.८ या नीचांकी तापमानाची नोंद झाली होती. त्यापुढील (२०१७) वर्षात नोव्हेंबर महिन्यात पारा १०.२, २०१८ मध्ये १०.८, २०१९ मध्ये १३.८, २०२० वर्षात १०.४, २०२१ मध्ये १२.२, २०२२ मध्ये ९.२ अंश आणि गेल्या वर्षी (२०२३) नोव्हेंबरमध्ये तापमान १४.१ या नीचांकी पातळीवर गेले होते. याचा विचार करता गेल्या आठ वर्षात शनिवार हा सर्वात थंड दिवस ठरला.

